## प्रकरण तिसरे

## १९ वे शतक आणि महाराष्ट्रातील शेतीव्यवसाय

१९ व्या शतकातील शेतीव्यवसायाचा विचार करताना १८१८ ला झालेला पेशवाईचा अंत आणि ब्रिटीश सत्तेचा महाराष्ट्रामधील उदय यांचा विचार करावा लागतो.

### ब्रिटीशपूर्व काळ :

ब्रिटीशपूर्व काळात म्हणजेच १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या काळामधील संस्थात्मक जीवनाचा परिणाम तत्कालिन शेतीव्यवसायावर झालेला पहावयास मिळेल. त्यावेळच्या समाज जीवनाचे नियंत्रण राज्यसंस्था, वतनसंस्था आणि जातिसंस्थामध्ये विभागलेले होते. त्यांचा संबंध महाराष्ट्र समाज जीवनाशी सतत येत होता.

राज्यसंस्थेची उभारणी ग्रामसंस्थेच्या पायावर उभी होती. गावचा प्रमुख म्हणून पाटील आणि ग्रामसेवक म्हणून कुलकर्णी काम करीत असे.[१] मराठा राज्यसंस्था म्हणजे ग्रामसंस्थेचे विकसित रूप होते. कारण १० किंवा १० पेक्षा जास्त गावांचा मिळून प्रांत बने आणि अशा अनेक प्रांतांचा मिळून `देश` बनत असे. आणि त्यांचा प्रमुख म्हणून `देशमुख` आणि मुख्य लेखापाल म्हणून `देशपांडे` काम करीत असत. `देशा` पेक्षा मोठया भूभागासाठी सरदेशमुख आणि सरदेशपांडे अशा स्वरूपाची कामे पहात असत.[२] याच बरोबर देशपांडे, देशमुख काम व्यवस्थित करतात किंवा नाही हे पाहण्यासाठी सुभेदारांची नेमणूकही केली जात असे.

### ग्राम जीवन :

महाराष्ट्रातील खेडयांचा इतर खेडयांशी अथवा शहरांशी फारसा संबंध आल्याचे आढळत नाही. टी. कोटस् यांनी महाराष्ट्रातील खेडयांचे वर्णन खालीलप्रमाणे केलेले आहे.

"The very appearance of a village in Maharashtra set it apart as a miniature world, self-sufficient in itself, and geared to a style of life calling for a minimum of contact with the world outside."[3]

अशा या खेडयांचा संबंध राज्यसंस्थेशी फारसा येत नसे. राज्यसंस्थेत झालेल्या उलथापालथीची झळ खेडयाला बसत नसे. मात्र या खेडयांच्या जीवनावर परिणाम घडविणारे दोन घटक म्हणजेच वतनसंस्था आणि जातिसंस्था खेडयाशी सततची जवळीक करुन असत. मराठेकालिन राज्यव्यवस्थेचा या दोन्हीही संस्था अविभाज्य घटक बनलेल्या होत्या. वरिष्ठ वतनदारांकडून कनिष्ठ वतनदारांची लुबाडणूक होत असे. वरिष्ठ वतनदारात सरदेशमुख, देशमुख, सरदेशपांडे, देशपांडे, देशकुलकर्णी, पाटील, कुलकर्णी इत्यादींचा समावेश होत असे. तर गाववतनदारात बारा बलुतेदार आणि बारा आलुतेदार यांचा समावेश होई. तथापी गाव पातळीवरील या बारा बलुतेदार आणि बारा आलुतेदार यांच्या वतनांची विभागणी जातीसंस्थेशी निगडित होती. वंशपरंपरेने गावाची पडेल ती कामे करण्याचे काम त्यांना करावे लागत असे. यावरुन ब्रिटीशपूर्व काळातील समाजव्यवस्थेची ओळख होऊ शकते.

राज्यव्यवस्थेमध्ये गाव हा महत्त्वाचा घटक होता आणि गावाच्या संपन्नतेवरच राज्यव्यवस्था अवलंबून होती असे दिसून येते. या गावामधील बहुतांश लोक शेतकी व्यवसाय करीत असत. ग्रामीण जीवनाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे ओघानेच शेतकरी हा ग्रामजीवनाचा प्रमुख घटक मानला जाणे स्वाभाविक आहे. तथापि शेतकरी उत्पादक म्हणून आणि महसूल वसुली जास्तीत जास्त ज्याच्याकडून वसूल करता येईल अशी व्यक्ती म्हणूनच पाहिला जात होता. गावाची लोकवस्ती कुणबी (शेतकरी) आणि (बिगर शेतकरी) या दोन विभागात विभागलेली होती.

BARR. BA... ...LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

गावामधील बहुसंख्य शेतकरी कुणबी जातीचे असत. त्यांच्यातही थळकरी अथवा मिरासदार आणि उपरी असे दोन प्रकार होते. थळकरी शेतकऱ्यांचा जमिनीवरचा हक्क कायमस्वरूपी होता तर उपरी हे कौलाने जमिनी वाहत. ठराविक काळाच्या करारावर शेती करण्यासाठी त्यांना ठराविक स्वरूपाची जमीन देऊन केली जात असे आणि त्या बदल्यात उपरी जमिनीवरील पट्टी सरकारला दिली जात असे. याशिवाय इनाम जमिनीही दिल्या जात असत. अर्थात अशा जमिनींवर कसल्याही प्रकारचा कर लादला जात नसे.[४]

वर उल्लेख आल्याप्रमाणे गाव पातळीवरील शेतीबाबतचा आणि गावाचा कारभार पाटील हा अधिकारी कुलकर्णी या सहाय्यक अधिकाऱ्याच्या मदतीने करीत असे. साधारणत: पाटील मराठा किंवा कुणबी जातीपैकी असे तथापि कुलकर्णी हा ब्राह्मणांपैकीच असे.[५]

पाटील हा ग्रामसंस्थेमधील प्रभावी अधिकारी होता. गावाने राज्यसंस्थेस किती प्रमाणात महसूल द्यावा याबाबत गावाचे प्रतिनिधीत्व मानलेदार आणि देशमुख यांच्याबरोबरच्या चर्चेत पाटील करीत असे. गावचे जास्तीतजास्त हित कसे साधले जाईल याची जबाबदारी पाटील पार पाडीत असे. शेती उत्पन्न जास्ती निघावे यासाठी जास्तीतजास्त जमीन लागवडीखाली यावी यासाठी उपरींना प्रोत्साहन देऊन त्यांना कौलावर जमिनी कसण्यास देण्याचा अधिकार पाटील वापरत असे.[६] जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहारही पाटील पहात असे. अर्थात अशा व्यवहारात आणि न्याय निवाडयासाठी पाटील पंचायतीचा सल्ला घेत असे.

शेतकऱ्यांशिवाय ब्रिटीशपूर्व कालखंडात आणखीन दोन समाजघटक होते. त्यामध्ये बलुतेदार आणि अलुतेदार हा एक घटक होय. यापैकी बलुतेदार ` कारू ` आणि अलुतेदार ` नारू ` या नावाने ओळखले जावयाचे.

ग्रामीण जीवनातील यांचे स्थान गावसेवकांचे होते. बलुतेदारात महार, लोहार, सुतार, मांग, कुंभार, चांभार, न्हावी, परिट, मट, गुरव, मुलाजा व कोळी यांचा तर अलुतेदारात तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवंत, डव-या, ठाकर, कडशी, तराळ, सोनार व चौगला यांचा समावेश होई.

तिसरा महत्वाचा घटक म्हणजे ब्राह्मण समाज होय. हा समाज इतर समाजापेक्षा (कुणबी, बलुतेदार, अलुतेदार) प्रभावीपणाने उठून दिसत असे. त्यांचे स्थान या समाजव्यवस्थेत महत्वाचे मानले जाई. ` वंश परंपरेने चालत आलेले ` जोशी ` पद ही त्यांची मक्तेदारी होती, जोशी म्हणजे गाव ज्योतीषी. (या गाव ज्योतीषांनी शुद्रादि शुद्रांची कशी लुबाडणूक केली हे जोतीरावांनी सांगितले आहे ते पुढे येईलच). याच ब्राह्मणांपैकी गावचा लेखापाल असे त्यास ` कुलकर्णी ` म्हणून ओळखले जाई.[७] कुलकर्णी गाव जमीनीचे रेकॉर्ड ठेवत असे, महसूलाचा हिशेब ठेवत असे. गावातील शिकलेला आणि ज्याला लिहता वाचता येते असा हा एकमेव कुलकर्णीच असे. त्यामुळे त्याचे महत्व गावात नेहमीच वरच्या पातळीवरील असे. पाटलाच्या विरोधात कुणबी लोकांना भडकावयाचे काम कुलकर्णी करीत असे याबाबत श्री. रविंद्र कुमार लिहितात, "He (Kulkarni) was also known to inspire a split between the cultivators of a community, and had a group of Kunbis in opposition to the Patil of the village."[8]

इ.स. १८१८ पूर्वी ब्राह्मणांच्यापैकी (देशस्थ, चित्पावन) चित्पावन समाजाचा प्रभाव पेशव्यांच्या कार्यपध्दतीवर पडलेला आढळून येतो. पेशव्यांशी त्यांचे जवळकीचे संबंध असल्याने तत्कालिन समाजव्यवस्थेत चित्पावनांच्या हातात राजकीय आणि सामाजिक सत्ता एकवटल्याने ब्राह्मणी प्रभाव ( Brahmanical dominance ) तत्कालिन महाराष्ट्रात खूपच पडलेला आढळून येतो.[९]

ब्रिटिशपूर्व काळात जात पंचायती होत्या आणि त्या आपापसात न्यायनिवाडे करण्याचे काम करीत असत. तथापी शिक्षणाचा गंध नाही, समाजाचे पक्के ज्ञान नाही यामुळे कनिष्ठ जातपंचायतींना न्याय निवाडा करण्यात अडचणी येत असत. अशावेळी हे लोक शास्त्री लोकांचा सल्ला घेत आणि तो मान्य केला जात असे.[१०] यामुळे ब्राह्मणांचे वर्चस्व वाढतच गेले असे दिसून येईल.

**शहरी जीवन :**

ग्रामीण भागातील जीवनापेक्षा शहरी भागातील जीवन वेगळे होते. जे.माल्कम याबाबतचे वर्णन करताना लिहितात की, मारवाडी, गुजर आणि सावकार यांच्याही पेक्षा जास्त प्रभावी घटक ब्राह्मण होते. शासकीय कार्यालयातील सर्व नोकऱ्यात ब्राह्मणांचाच भरणा होता. पेशव्यांची भिस्त या लोकांवरच असावयाची.[११] ब्राह्मणांना जास्तीत जास्त विशेषाधिकार या काळात मिळालेले आढळून येतील. त्यापैकी एक महत्वाचा अधिकार म्हणजे ` दक्षिणा ` पध्दती होय. याच बरोबर पेशव्यांनी एकट्या पुण्यात १६४ पाठशाळा सुरु केल्या होत्या आणि त्यामध्ये फक्त उच्चवर्णीयांनाचा प्रवेश मिळू शकत असे.[१२]

ब्राह्मणांबरोबरच शहरातील सावकार वर्ग हा महत्वाचा वर्ग होता. ग्रामीण भागातील वाण्यापेक्षा या सावकारांचा दर्जा वेगळा होता. खेडेगावात वाण्यांवर नियंत्रण ठेवणारी पंचायत संस्था होती तशी संस्था शहरामध्ये सावकारांवर नियंत्रण ठेवणारी नव्हती आणि त्यामुळे सावकारांच्याकडून लोकांचे जास्तीत जास्त शोषण होण्याचा मार्ग मोकळा झाला होता.[१३]

**शेतजमीन मालकी :**

गावातील जमिनीची मालकी ब्रिटीशपूर्व काळात संपूर्ण गावाची मानली जात असे. वंशपरंपरेने जमिनीची मालकी ज्यांच्याकडे आली असे त्यास ` मिराशी ` म्हटले जात असे. रोमेश दत्त याबाबतचे विश्लेषण देताना सांगतात, "The most important feature of society under the Maratha rule was the cultivation of the land by peasant proprietoers, called Mirasdars or hereditary owners of their fields."[14]

` मिराशी ` जमीनी नंतर मिरासदारांच्या जथ्यात (Jathas) विभागल्या गेल्या आणि हे जथ्था त्यांच्याकडील जमीनीवर शेती करीत असत. जथ्यापैकी प्रत्येक सदस्य त्याच्या वाटणीला आलेल्या शेतजमीनीवर शेती करीत असे.[१५]

मिरास जमीनीशिवाय गावामध्ये लागवडीखाली न आलेली जमीन असे.तसेच एखाद्या कुटुंबातील सर्वच लोक मेल्यामुळे नावारस झालेली जमीन असे. अशा जमीनीबाबतचे निर्णय ग्राम पंचायतीत घेतले जात असत. गावाचे उत्पादन वाढावे म्हणून ` उपरी ` लोकांना जमीन मशागतीसाठी गावचा पाटील ` कौल ` म्हणून देत असे. त्यासाठी ठराविक कालावधी ठरवला जात असे. त्यामुळे अशी जमीन ` उपरी ` च्या मालकीची अशी कधी होत नसे.

जमीन मालकीचा आणखीन एक प्रकार म्हणजे ` इनाम ` जमीनी होत. गावातील लागवडीखाली न आलेली जमीन, कुटुंबातील सर्वच लोक मेल्यामुळे नावारस झालेली जमीन, गावच्या मालकीची परंतु मशागतीखाली

नसलेली जमीन याशिवाय ` इनाम ` वेगळे असे. कामाच्या मोबदल्यात जमीनी ` इनाम ` म्हणून दिल्या जात असत. उदाहरणार्थ देवकीच्या कामासाठी, सरकारी नोकरीचा मोबदला म्हणून ` इनाम ` देण्याची प्रथा अस्तित्वात आली.[१६] त्यामधून वतनसंस्था सदृढ झाली. यामधून फार मोठया प्रमाणात गावातील जमीन अशा इनामदारांकडे आली. अशा इनाम जमीनी प्रामुख्याने सरकारी यंत्रणेतील अधिकारी (पाटील, कुलकर्णी, देशमुख, सरदेशमुख, देसाई, सरदेसाई इत्यादी) यांच्याकडे मोठया प्रमाणात गेल्या.[१७] यामधूनच सरंजामशाहीचे वर्चस्व तत्कालिन महाराष्ट्र जीवनावर वाढू लागले असे म्हणता येईल.

याच बरोबर संपूर्ण गावच ` इनाम ` म्हणून देण्याची पध्दती होती. अशी गावे देशमुख आणि इतर वंशपरंपरागत शासकीय अधिकारी, मोठी देवालये, धार्मिक कामे करणारे अशा लोकांनी दिली जात असत.[१८] म्हणजे ` इनाम ` जमीनी आणि ` संपूर्ण गाव इनाम ` असे दोन प्रकार ब्रिटीशपूर्व काळात अस्तित्वात होते.

करवसुलीची पध्दती :

राज्य चालविण्यासाठी प्रजेकडून कर रूपाने पैसा जमा केला जात असे तो महसुलाचा मोठा हिस्सा होता. हे कर निरनिराळ्या प्रकारचे असत. बाळाजी बाजीरावाच्या रोजनिशीवरून ` अव्वल, दुम व स्तम म्हणजे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे जमीनीचे वर्ग पाडून त्याप्रमाणे शेतसारा घेत,`[१९] असे आढळून येते.

करवसुलीची पूर्वपरंपरागत चालू असलेल्या यंत्रणेत पेशवेकाळात फारसा फरक पडलेला आढळून येत नाही. या यंत्रणेच्या घटकांमध्ये देशमुख, मामलेदार, पाटील इत्यादींचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

शेतसारा वसुलीची निश्चित पध्दती पेशवेकाळात ठरवून दिलेली होती असे आढळून येत नाही. शेत उत्पन्नावर पैशाच्या स्वरूपात कर वसूल

केला जात असे. तथापी कर वसूली किती प्रमाणात केली जावयाची हे निश्चित नव्हते. कधी उत्पन्नाच्या प्रमाणावर तर कधी लागवडीखालील जमीनीच्या आधारावर शेतसारा आकारणी केली जावयाची.[२०] मात्र एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की गाव हा प्रमुख घटक मानून गाववार शेतसारा वसूल केला जात असे.[२१]

महसूल प्रशासनात मामलेदार हा महत्वाचा प्रशासकीय अधिकारी असे आणि पेशव्यांशी निष्ठा असणाऱ्या व्यक्तीची नेमणूक अशा पदावर केली जात असे. मामलेदार जास्तीत जास्त शेतकऱ्यांकडून सारा वसूली करण्याचा प्रयत्न करीत असे. यासाठी त्यास देशमुखाची मदत होई. कोणत्या गावाने किती शेतसारा द्यावा याबाबतची बोलणी गावाच्या वतीने आणि देशमुखाच्या मध्यस्थीने पाटील करीत असे आणि त्यामधून गावचा शेतसारा निश्चित केला जात असे.[२२] अर्थात असा शेतसारा ठरविण्यात मामलेदाराचा वरचष्मा कायम असे. अशाप्रकारे शेतसारा निश्चित झाल्यावर रिवाजाप्रमाणे पाटील प्रत्येक कुटुंबाने किती सारा द्यावयाचा हे निश्चित करीत असे.[२३]

दुसरा बाजीराव पेशवा यांच्या काळात मात्र शेतकऱ्यांवरील जुलूम खूपच वाढल्याचे आढळते. पानिपतच्या (१७६१) पराभवानंतर पेशवाईची सूत्रे माधवराव पेशवे यांच्याकडे आली. तथापी ते नाबालिक (Minor ) असल्याने त्यांच्या नावाने दरबारी मंडळींनी जनतेची मन मानेल तशी लयलूट चालू केली. पेशव्यांची राज्यव्यवस्था सरंजामशाही राज्यव्यवस्था बनली आणि दुसऱ्या बाजीरावाच्या काळात सरंजामशाहीने कळसच गाठला. मामलेदाराच्या कार्यालयाचा लिलाव सुरू झाला आणि हा लिलाव घेणारांनी मन मानेल त्याप्रमाणे शेतकऱ्यांकडून सारा वसूली सुरू केली. त्याच्या विरोधात न्याय मागण्याची यंत्रणा मोडून पडली होती. तयामुळे शेतकऱ्यांचे हाल होऊ लागले. जुलूम वाढला. परिणामत: बऱ्याच

शेतक-यांनी शेती करण्याचे सोडून दिले, गावचे गावे ओस पडू लागली.[२४] जे शेती करीत त्यांना उत्पन्न मिळत नसतानाही शेतसारा भरण्यासाठी कर्ज काढावी लागू लागली. परिणामत: शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले आणि सावकारशाहीला ऊत आला. दुस-या बाजीरावाच्या सारा वसूली धोरणाचा परिणाम शेतक-यांवर कसा झाला याची माहिती देताना श्री. रविंद्र कुमार लिहितात - "The practice of farming villages was revived by Baji Rao II, and it inflicted great misery and suffering upon the Kunbis during the twilight of the Peshwas."[25]

सरंजामशाही शेतीव्यवसायाची वैशिष्ठ्ये :

ब्रिटीशपूर्व काळातील शेतीव्यवसाय सरंजामशाही शेतीव्यवसाय बनला होता. त्या व्यवस्थेची खालीलप्रमाणे काही वैशिष्ठ्ये होती.[२६]

१) मराठेशाहीत शेतीवर वैयक्तिक मालकी नव्हती. शेती तशी सामूहिक मालकीची होती. सरकारने काही अटीवर ती शेतक-यांना कसायला दिलेली होती.

२) गावात मिरासी व उपरी असे शेतक-यांचे दोन प्रकार होते. मिरासदार हे गावच्या वसाहतीपासून शेताचे वहिवाटदार होते. उपरी शेतक-यांना कौलनामा देऊन शेत कसण्यासाठी बोलावले जाई.

३) राजा आणि शेतकरी यांच्यात तसे प्रत्यक्ष संबंध नव्हते. राजा आणि शेतकरी यांच्यात देशमुख, मामलेदार आणि पाटील हे अधिकारी होते. गावाचा शेतसारा मामलेदार आणि पाटील परस्परांशी विचारविनीमय करून ठरवीत असत.

४) शेतसाऱ्याची आकारणी व्यक्तीशः होत नसे. संपूर्ण गावाचा शेतसारा ठरवला जाई. तो गोळा करण्याचा आणि सरकारच्या खजिन्यात भरण्याचा अधिकार पाटलास होता.

५) गावात पाटला बरोबरच गावपंचायतही महत्वाची भूमिका पार पाडत असे. शेतसारा पाटील गावपंचायतीशी सल्लामसलत करून ठरवीत असे. शेतीच्या हस्तांतरणावर पंचायतीचे नियंत्रण असे.

६) त्या काळात गावात गुजर, वाणी, मारवाडी यांची सावकारी होती. शेतकरी त्यांच्याकडून कर्ज घेत. पण कर्जाच्या मोबदल्यात शेत लिहून देण्याची पध्दती नव्हती. त्याशिवाय दामदुपटीचा कायदा त्यावेळी प्रचलित होता. एकदा व्याज मुदलाइतके झाले म्हणजे त्यापेक्षा जास्त पैसा वसूल करायाचा अधिकार सावकारास नव्हता. सावकाराला कर्ज वसूल करण्यासाठी राज्यसंस्था मदत करीत नसे. त्याला त्यासाठी पंचायतीकडे फिर्याद करावी लागे. आपल्या कर्जाची वसूली करण्यासाठी सावकार शेतकऱ्याच्या घरासमोर धरणे धरीत असे.

७) सरंजामदारी व्यवस्थेत शेतकऱ्यांवर सावकारांचा जुलूम वेगळ्या प्रकारचा होता. सरकार मोठया सावकारांकडून कर्ज घेत असे आणि त्या कर्जाची भरपाई करण्यासाठी मुलखातील सारा वसूली करण्याचा अधिकार सावकारास दिला जाई. पैसा वसूल करण्यासाठी सावकार शेतकऱ्यांवर जुलूम करीत असत.

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात ब्रिटीशपूर्व काळातील चौसाळकरांनी वर नमूद केलेल्या वैशिष्टयांपैकी बरीच वैशिष्टये धुळीस मिळाल्याचे आढळून येते आणि सरंजामशाहीचा बळी शेतकरी पडला. दामदुपटीचे धोरण हळूहळू संपुष्टात येऊ लागले. शेतसारा मनमानेल तसा घेतला जाऊ लागला. अन्यायाविरोधी न्याय मागण्याची व्यवस्था ढासळली.

शेतीव्यवसाय मोडकळीस आला. संपूर्ण समाज सरंजामशाहीच्या विळख्यात अडकून पडला आणि जनतेच्या दु:खास पारावार उरला नाही असेच चित्र पेशवाईच्या शेवटच्या पर्वातील समाजव्यवस्थेचे दिसून येते. त्यामुळे संपूर्ण समाज व्यवस्था खिळखिळी झाली होती. कोणाचा पायपूस कोणास नव्हता आणि त्यामुळे इ.स. १८१८ ला पेशव्यांचा पाडाव करून महाराष्ट्रात ब्रिटीश राजवट प्रस्थापित करण्यास फारशी अडचण भासली नाही.

ब्रिटीश कालखंड :

`रयतवारी` पध्दती :

पेशवाईच्या काळात शेतकी व्यवसायास लागलेल्या ग्रहणाने दुस-या बाजीरावाच्या काळात या व्यवसायास पूर्णत: ग्रासून टाकले असे म्हणावे लागेल. ब्रिटीशांनी आपली राजवट सुरू केल्या बरोबर जर प्रथमत: कोणत्या गोष्टीकडे लक्ष दिले असेल तर शेतसारा कसा आकारावा या बाबीकडे. दुस-या बाजीरावाच्या काळात निर्माण झालेल्या सरंजामशाहीमुळे शेतकरी लुटला जात होता आणि राज्यसंस्थेशी शेतक-याचा संपर्क नसल्याने तो सतत नाडला जात होता. शेतसारा वसुलीस नियम असे राहिले नव्हतेच. ब्रिटीशांनी उत्पन्नाचे साधन म्हणून शेतसारा वसुलीकडे लक्ष पुरवले. तथापी समाजव्यवस्थेमधील वर्गवारी कमी करण्याचा प्रयत्न मात्र केला नाही. परिणामत: ब्रिटीशांच्या धोरणाचा उपयोग सरंजमशाह, नोकरशहा, सावकार यांनाच झाल्याचे दिसून येते.

मराठा कालखंडात जमीन गावाच्या मालकीची मानली जावयाची. त्यात बदल करण्यात आला. ब्रिटीश अर्थशास्त्रीय सिध्दांताने प्रभावित झालेल्या ब्रिटीश अधिका-यांनी भारतात ` जमीनदारी ` आणि ` रयतवारी ` अशा दोन पध्दतीत शेतीव्यवसाय विभागला. मद्रासमध्ये लागू केलेली रयतवारी पध्दती थोडया फार फरकाने महाराष्ट्रात लागू

करण्यात आली. आणि जमीनविषयक धोरणात एक मूलगामी स्थित्यंतर झाल्याने ग्रामजीवन बदलून गेले. प्रिंगल या ब्रिटीश अधिकाऱ्याने सामुहिक जबाबदारीखेजी व्यक्तिगत जबाबदारीचे धोरण या बाबतीत राबविण्याचे ठरविले. उपयुक्ततावादी विचारसरणीचा प्रभाव असलेल्या प्रिंगल यानी शेतसारा निश्चितीसाठी रिकार्डोच्या खंड सिध्दांताचा आधार घेतला आणि ही सूचना प्रथमत: त्याने इ.स. १८२३ मध्ये केली.[२७]

प्रिंगल यास महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेचे जे साहुहिक स्वरूप आहे त्यामुळे ग्रामीण भागाची प्रगती होत नाही असे वाटत होते. शेतकरी आणि राज्यव्यवस्था यांचा संबंध सरळ जोडावयाचा असेल तर पाटील, पंचायत, देशमुख यांचा हस्तक्षेप रद्द केला पाहिजे अशी प्रिंगल याची भूमिका होती.[२८] यासाठी प्रिंगल यानी शेतसारा ठरविण्यासाठी जमीनीचे प्रकार ठरवून, त्या जमीनीत येणाऱ्या पिकाच्या ५५ टक्के किंमत शेतसारा म्हणून शेतकऱ्याने भरावयाची. ही पध्दती प्रथमत: इंदापूर तालुक्यात इ.स. १८३० ला लागू करण्यात आली.[२९] तथापी ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. कारण यासाठी आवश्यक ते सर्वेक्षणाचे काम ज्यांच्याकडे सोपवले होते त्या ब्राह्मण नोकरशाहीने[३०] केलेले सर्वेक्षण चुकीचे होते, उत्पन्नाची प्रतवारी अवास्तव होती तर महसूल मागणी अवाजवी होती. त्यामुळे या योजनेस फारसे यश आले नाही.[३१]

इ.स. १८३५ ला शेतसारा ठरविण्यासाठी नवीन सर्व्हे घेण्यासाठी जी. विंगेट आणि गोल्डस्मीड यांनी बॉम्बे सर्व्हे सिस्टम आणली आणि यामधून ' रयतवारी ' पध्दती अस्तित्वात आली.

रयतवारी पध्दती ठरवताना एक सर्वसामान्य धोरण मानले होते आणि ते म्हणजे शेतसारा शेतकरी भरू शकेल एवढा असावा. त्यादृष्टीने संपूर्ण भागाचा पूर्वीचा कर लक्षात घेऊन उत्पन्न ठरवले जाई,

12205
A

त्याच बरोबर बाजारातील पिक किंमतीतील वाढ अंदाजाने लक्षात घेतली जाई. तसेच पाणी व्यवस्था, जमिनीची प्रत आणि तिची बाजार किंमत लक्षात घेतली जाई. ही सर्व किंमत एकत्र करून त्या विभागातील गावाच्या संख्येने तिला भागून एका गावचा हिस्सा काढला जाई आणि त्यानुसार प्रत्येक शेतक-याने किती शेतसारा भरावयाचा याचा दर निश्चित केला जात असे. ही पध्दती पुढील ३० वर्षांसाठी लागू केली जाई.[३२]

यावरून रयतवारी शेती पध्दतीची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील :

१) रयतवारीमुळे शेतीची मालकी शेत कसणा-याची झाली.
२) शेतसारा पैशाच्या रूपाने सरकारला द्यावा लागे.
३) शेतसारा तीस वर्षांसाठी एकदम ठरवला जाई.
४) जमीन गहाण ठेवणे, विकत घेणे, विकणे या प्रक्रीया यामुळे शक्य झाल्या.
५) कर प्रत्यक्ष शेतक-याने भरण्याची पध्दती सुरू झाली.
६) शेतसारा मुदतीत न भरल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा हक्क सरकारला मिळाला.

रयतवारी पध्दतीचा अंमल १८३५ पासून महाराष्ट्रात सुरू झाला. शेतक-यांची जमिनीची मालकी मान्य झाली. जमिनीची मोजणी झाली आणि त्यास भूमापन क्रमांक दिला गेला. महसुलाच्या सामायिक मालकीचे तत्व संपुष्टात आले. त्यामुळे नव्या व्यवस्थेत शेतकरी एकाकी पडल्याचे दिसते. ग्रामीण अर्थव्यवस्थेला भांडवलशाही आर्थिक सिध्दान्त लागू करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण अर्थकारणास वेगळे वळण लागले यात नवली नाही. याचा परिणाम शेती सुधारारवजी शेतकीची अवन्नती होण्यामध्येच झाल्याचे आढळून येते.

रयतवारी पध्दतीतून निर्माण झालेले प्रश्न :

ब्रिटीशांनी जास्तीत जास्त महसूल प्राप्त करण्याचे हुकमी साधन म्हणून रयतवारी पध्दती मुंबई इलाख्यात प्रथमत: इंदापूर तालुक्यात आणि तदनंतर संपूर्ण इलाख्यात लागू केली. त्यामधून एक समाधानाची बाब पुढे आली ती म्हणजे सरंजमशाही अधिका-यांच्या जाचातून शेतक-यांची सुटका झाली, शेतीची मालकी शेतक-यास मिळाली. तथापि या रचनेने नवीन समस्यांना जन्म घातला आणि सरंजामशाहीतून सुटका होण्याऐवजी सरंजामशाही आणि मांडवलशाही अशा दोन संकटात शेतकरी अडकून पडला. रयतवारी पध्दतीमुळे निर्माण झालेल्या समस्यांमुळे शेतक-यांचे शोषण थांबू शकले नाही.

१) सावकारशाहीचा उदय -

ब्रिटीशपूर्व काळात ग्राम पातळीवर ` वाणी ` सावकारी करीत असे. तथापी त्याच्या सावकारीवर ग्राम पंचायतीचे नियंत्रण असे. दामदुप्पटीचे धोरण त्यावेळी अंमलात होते. त्यामुळे दिलेल्या कर्जाची फेड जास्तीतजास्त कर्ज रक्कमेएवढी रक्कम व्याज म्हणून देण्यापर्यन्त मर्यादित होते. तर सावकार हा शहरापुरता मर्यादित होता. त्यास गावामध्ये कर्ज वाण्याच्यामार्फत द्यावे लागत असे. तथापी ब्रिटीश काळात लागू झालेल्या रयतवारी पध्दतीने शेतीची मालकी व्यक्तिगत आणि त्यामुळे शेतसारा भरणे व्यक्तिगत पातळीवर होऊ लागल्याने वाण्याने पूर्वीच्या मर्यादा ओलांडून, आपल्या समव्यवसायिकांकडून मदत घेऊन सावकारी चालू केली आणि शहारातील सावकारांचा त्यास पाठिंबा मिळू लागला.

ब्रिटीशपूर्व काळात शेतीतील उत्पन्न वाढले अथवा कमी झाले याचा विचार करून पाटील देशमुखाच्या माध्यमातून मामलेदाराशी चर्चा करून शेतसारा ठरवू शकत होता. तथापी रयतवारी पध्दती तीस वर्षांचा सारा एकदम ठरवला गेल्याने प्रत्येक वर्षीचा सारा ठरलेला होता. त्यात

बदल होणे शक्य नव्हते. पाऊस पडो अथवा न पडो, पिक मिळो अथवा न मिळो, दुष्काळ पडलेला असो शेतसाऱ्यात फरक मात्र होत नसे. शेतसारा सुगीपूर्वी भरावाच लागत असे. अशा परिस्थितीत आपली शेती कायम रहावी म्हणून सावकारांकडून कर्ज घेण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर मार्गच शिल्लक रहात नव्हता. अशावेळी सावरकारही दिलदारपणाने कर्ज देत असत. कारण शेतकऱ्यांना नागवण्याचे हत्यार त्यांच्या हाती आले होते. गरीब शेतकऱ्यास प्रथमत: कर्ज द्यावयाचे आणि नंतर कर्ज फिटत नाही म्हणून जमीन बळकावयाची हा तर सरळ सरळ धंदाच बनत चालला होता. श्री. एस. नटराजन् यांनी इ.स. १८५१ ते १८६५ या काळात शेतकऱ्यांच्या जमीनी कर्जापोटी काढून घेण्याबाबतची कोर्ट कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे. त्यावरून शेतकऱ्यांची दयनीय परिस्थिती लक्षात येऊ शकेल. कोर्ट केसीस अशा होत्या.[३३]

<u>शेतजमीनीबाबतच्या कोर्ट केसीस १८५१-६५</u>

| वर्ष | १८५१ | १८६१ | १८६५ |
|---|---|---|---|
| अहमदनगर | ९८ | ३१८ | ६८९ |
| पुणे | ७५ | २८२ | ६३२ |

इ.स. १८७५ ला उसळलेल्या शेतकऱ्यांच्या दंगलीबाबत चौकशी करणाऱ्या समितीच्या पाहणीत असे आढळून आले की, रयतवारी पध्दतीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा तोंडावळाच बदलून गेला होता. कुणब्यांच्या मालकीच्या जमीनी आता वाण्याच्या मालकीच्या झाल्या होत्या. गावातील पाटील, की जो एके काळी गावचा कारभार पहावयाचा, प्रमुख शेतकरी असावयाचा. वाण्याचा शेतावर कुळ म्हणून काम करीत होता. समाजातील त्याची प्रतिष्ठा हा इतिहास बनला होता.[३४]

ब्रिटीशांच्या आगमनामुळे स्वयंपूर्ण खेडी नाहीशी होऊ लागली त्यामुळे शहरांशी त्यांचा संबंध येऊ लागला. शेतकऱ्यांचा माल शहरी व्यापारपेठांमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी खरेदी होऊ लागला. त्याचा परिणाम ओघानेच शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर पडू लागला. त्यामुळे सावकारशाहीचे पाश अधिकच बळकट होऊ लागले. सरकारी कायदेही शेतकऱ्यांपेक्षा सावकारांना अधिक सोयीस्कर होते. शेतीची अवजारे व बैल कर्जादाखल जप्त करण्यात येऊ नयेत हे कलम १८५९ च्या कायद्यात गाळण्यात आले, व थकबाकी वसूल करण्यासाठी दावे घालण्याची मुदत १२ वर्षांवरून ३ वर्षांवर आणण्यात आली. अमेरिकेतील यादवी युध्दामुळे १८६२ नंतर बाजारात तेजी येत होती. म्हणून कायद्यातील या बदलांचे परिणाम तात्काळ दिसून आले नाहीत. भाववाढीचा फायदा घेऊन सरकारने १८६८ साली सारा वाढविला. त्यामुळे भाव गडगडू लागताच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला सीमा राहिली नाही. एकट्या पुणे जिल्ह्यात जप्तीचे अर्ज १८६८ पासून १८७३ पर्यन्तच्या सहा वर्षांत १२००० वरून २८००० पर्यन्त वाढले. यावरून शेतकऱ्यांच्या त्या वेळच्या हलाखीची कल्पना येईल."[३५]

**शेतकऱ्यांचा उठाव :**

इ.स. १८७५ ला झालेल्या शेतकऱ्यांच्या उठावाची बिजे रयतवारी पध्दतीमध्ये पहावयास सापडतात. ग्रामजीवनातील सामुहिक जबाबदारीचे तत्व रयतवारी पध्दतीने संपुष्टात आले आणि त्यामुळे ग्रामजीवनामधील सहकाराच्या वातावरणात दुर्गतपणा आला. गाव पंचायतीचे नियंत्रण कमी झाले आणि स्वार्थी प्रवृत्ती वाढल्या. स्वार्थ साधण्यासाठी सावकारशाहीने गरीब शेतकऱ्यांचे शोषण करण्यास सुरुवात केली आणि ग्राम जीवनामध्ये असंतोष वाढला.

रयतवारी पध्दतीमुळे [illegible] शेतसारा तीस वर्षांसाठी ठरविण्यात आला तो इ.स. १८३६ ला त्यास १८६६ ला तीस वर्षे पूर्ण झाली. त्याच दरम्यान शेतमालाच्या किंमती वरच्या पातळी-वरच्या होत्या त्यास धरून पुढील तीस वर्षांचा शेतसारा ठरविण्यात आला. अमेरिकेतील यादवी युध्दाचा शेवट झाल्याने कच्चा माल अमेरिकेतून युरोपकडे येऊ लागल्याने शेतक-यांच्या मालाच्या किंमती घसरू लागल्या. तथापी शेतसारा मात्र कायम राहिला. परिणामत: शेतसा-याचा जादाचा बोजा शेतक-यावर पडू लागला. आणि तो शेतसारा भरण्यासाठी शेतकरी कर्जबाजारी होऊ लागला.

कर्ज वाण्यांकडून घेण्याशिवाय शेतक-यांकडे पर्याय नव्हता. इ.स. १८१८ पूर्वीच्या दामदुप्पट धोरणास कधीच मुठमाती दिली गेली असल्याने वाण्यांनी शेतक-यांना लुटण्याचे धोरण सुरू केले आणि त्यामधून शेतक-यांच्या जमीनी बळकावण्याचे धोरण सुरू केल्याने शेतकरी आणि वाणी यांच्यामध्ये दुरावा निर्माण होऊन तो संघर्षाचे रूप धारण करू लागला. यातच " सावकारांनी कर्जवसूलीसाठी शेतक-यांविरूध्द भराभर न्यायालयात दावे लागले. "[36] " कोर्टाचे कामकाज तालुक्याच्या ठिकाणी चाले. वारंवार तारखा लागत. शेतीची कामे सोडून त्या त्या वेळी हजर राहणे शेकत-यांना अडचणीचे होई. न्यायालयातील शिरस्तेदार, कारकून, वकिल, न्यायाधीश हे सर्व उच्चवर्णीय असल्याने त्यांचा स्वाभाविक कल सावकारांकडे असला तर नवल नाही. शेतकरी अशिक्षीत व परिस्थितीने नाडलेला, शिवाय कराराच्या मूलतत्वांची त्यास बिलकूल माहिती नव्हती. सावकारापुढे ब्र काढण्याची त्याची हिंमत नसे. त्याने समोर ठेवलेल्या कागदावर तो निमूटपणे अंगठा उठवी. या सर्व व्यवहारात अखेर त्याला आपली जमीन गमवावी लागे. "[37] अशी शेतक-यांची स्थिती झाली होती.

श्री. रविंद्र कुमार यांनी या लुबाडणीची उदाहरणे देताना सांगितले आहे, " पारनेरच्या देशमुखाकडे १८१८ ला असलेली ५०० एकर जमीन १८७५ पर्यन्त गावच्या मारवाड्यांनी गिळंकृत केली होती. अन्दू धोंडीबाची ३० एकर जमीन मारवाड्याकडे गहाण पडली होती, तर तात्या बीन बापू गायकवाड यांची १५० एकर जमीन द्धुल्लक रु. ७५ साठी कपूरचंद मारवाड्याने गडप केली होती, तसेच केवळ ३५ रुपयांच्या बाबतीत १८६० ला झालेल्या कराराच्या मोबदल्यात नवजी बीन त्रिंबकजी यांची ४८ एकर जमीन औदाराम मारवाड्याकडे पडून होती." [३८] ही मोजकी उदाहरणे शेतकऱ्यांचे शोषण स्पष्ट करण्यास पुरेशी आहेत.

यामधून कुणबी आणि वाणी यांच्यामधील संबंधात कडवटपणा येण्यास सुरूवात झाली. यामधून शेतकऱ्यांच्यामध्ये असंतोष वाढू लागला आणि त्याचा उद्रेक १८७५ च्या उठावात झाला. त्याचा पहिला आघात भिमथरी तालुक्यात सुपा या गावी १२ मे, १८७५ ला झाला आणि त्यात वाण्याचे घर आणि दुकान लोकांनी पेटवून दिले अर्थात मनुष्यहानी झाली नाही. त्यानंतर लगेचच २४ तासांच्या अंतराने जवळच्याच कैरगावामध्ये मारवाड्याचे घर पेटवून देण्यात आले. या उठावात शेतकऱ्यांची मनुष्यहानी करण्यावर अजिबात भर दिला नाही. अहिंसात्मक मार्गांनी त्यांनी आपला उठाव केला. आंदोलनाचा रोख सावकारांकडील कागदपत्रे जमा करून जाळून टाकण्यावर होता. डेक्कन रॉयटस् कमिशनच्या रिपोर्टमध्ये या उठावाच्या अहिंसात्मक स्वरूपाचे वर्णन स्पष्ट शब्दात केले आहे ते असे. [३९]

"In reviewing the character of the disturbances generally the most remakrable feature presented is the small amount of serious crime. A movement which was a direct appeal to physical force over a large area usually restrained within the limits of a mere demonstration; the moderation is in some measure to be attributed to the nature of movement itself. It was not so much a rebellion

against the oppressor, as an attempt to accomplish a very definite and practical object, namely, the disarming of the enemy by taking his weapons (bonds and accounts), and for that purpose mere demonstration of force was usually enough."

<u>कृषी सहाय्य कायदा</u> :

शेतक-यांच्या उठावानंतर ब्रिटीशांना आपल्या धोरणाचा नव्याने विचार करावा लागला आणि त्याचाच परिणाम म्हणजे १८७९ चा कृषी सहाय्य कायदा होय. परंतु या कायद्याचा उपयोग शेतक-यांना फारसा झाला नाही. शेतक-यांचे शोषणापासून संरक्षण व्हावे हा उद्देश या कायद्याचा असला तरी या कायदेशीरपणाचा आपल्याला काही फायदा होणार नाही म्हणून वाण्यांनी कर्ज देण्याबाबत असलेले धोरण बदलून ते परिदृढ केले. याची झळ छोटया शेतक-यांना जास्त बसली.

त्याच बरोबर शेतक-यांच्या अज्ञानामुळे परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. बहुसंख्य शेतक-यांना या नवीन कायद्याची माहितीसुध्दा नव्हती.[४०] तसेच या कायद्याचा फायदा वाण्यांनीच घेतल्याचे दिसून येते. याच काळात महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडल्याने तर शेतकरी पूर्णत: हवालदिल झाला. शेतक-यांची लुबाडणूक थांबवण्याच्या दृष्टीने या कायद्याचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही.[४१] हेच खरे.

१९ व्या शतकातील शेतीच्या संदर्भातील चढउतारांचा परिणाम शेतकरी आणि शेती यांचेवर कसकसा झाला याचा विचार चौथ्या प्रकरणात केला आहे.

## संदर्भ आणि टीपा

१) कुमार रविंद्र - " वेस्टर्न ईंडिया इन नाईन्टिन्त सेंच्युरी," पृ. १५
२) पॉविल बडेन - " दि लॅण्ड सिस्टम ऑफ ब्रिटीश ईंडिया," खंड ३, पृ. २०२-२०३.
३) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १६-१७.
४) गुहा सुमित - " दि अॅग्रिरिअन इकॉनॉमी ऑफ दि बॉम्बे डेक्कन," पृ. ९-१०.
५) शिंदे ज.रा. - " डायनॅमिक्स ऑफ कल्चरल रेव्हल्युशन इन नाईन्टिन्त सेंच्युरी महाराष्ट्र," पृ. ७.
६) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. २६.
७) किता - पृ. ३०.
८) किता, पृ. ३१.
९) किता, पृ. ३९.
१०) किता, पृ. ४१.
११) शिंदे ज.रा. - पूर्वोक्त, पृ. १०.

१२ दक्षिणा : हिंदू धर्मशास्त्रांचा अभ्यास करणारांना तत्कालिन समाज व्यवस्थेत श्रेष्ठ मानले जात असे आणि त्यांचा आदर करण्यासाठी भेट देण्याची पध्दती ' दक्षिणा ' म्हणून प्रसिध्द आहे. रविंद्र कुमार याचे वर्णन असे करतात. "The 'dakshina', literally a gift, was the means through which the Peshwas extended support to the brashmans in their role as the custodians and propagators of the values of Hinduism", p. 39.

१२) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. ४०.
१३) शिंदे ज.रा.- पूर्वोक्त, पृ. ११.
१४) दत्त रोमेश - " इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया, व्हिक्टोरीयन एज," पृ. ५१.
१५) धर्मकुमार - " दि केंब्रिज इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया," खंड २, पृ. १७८.
१६) सरदार गं.बा. (संपा.) " महाराष्ट्र जीवन," खंड १, पृ. ३८३.
१७) धर्मकुमार - पूर्वोक्त, पृ. १७९.
१८) किंवा - पृ. १८१.
१९) महाराष्ट्र जीवन, खंड १, पृ. ३८१.
२०) धर्मकुमार - पूर्वोक्त, पृ. १८१.
२१) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १८.
२२) किंवा, पृ. १५.

२१ रिवाज : ब्रिटीशपूर्व काळामध्ये जमीन महसूल पाटील आणि मामलेदार यांच्या चर्चेतून संपूर्ण गावासाठी ठरविला जावयाचा. तदनंतर त्याची विभागणी करण्याचा अधिकार जथ्यास (शेतक-यांच्या कुटूंबाचा समुह) असे. ही सारा विभागणी करण्यासाठी गावाच्या ज्या परंपरा होत्या त्यास अनुसरून सारा विभागणी ठरविली जात असे त्यास ` रिवाज ` म्हणत. थोडक्यात ` रिवाज ` म्हणजे परंपरा होय. या पध्दतीत माधवराव पेशव्यांच्या काळात बदल होऊन जथ्याचा अधिकार कमी करण्यात आला आणि रिवाज पध्दतीत बदल होऊन शेतसारा सरळ सरकारकडे देण्याची पध्दत सुरू झाली.

२३) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १९.

२४) धर्मकुमार - पूर्वोक्त, पृ. १८२.

२५) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १६.

२६) चौसाळकर अशोक - "महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ," पृ. ६.

२७) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. ८६.

२८) कित्ता.

२९) धर्मकुमार - पूर्वोक्त, पृ. १८५.

३०) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. ९६.

३१) दत्त रोमेश - पूर्वोक्त, पृ.५२.

३२) धर्मकुमार - पूर्वोक्त, पृ. १८५.

३३) शिंदे ज.रा. - पूर्वोक्त, पृ. १८.

३४) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १५७-१५८.

३५) पंडित नलीनी - "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास," पृ. २९.

३६) शिंदे ज.रा. - पूर्वोक्त, पृ. १८.

३७) सरदार गं.बा. - "महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार," पृ. १८३.

३८) कुमार रविंद्र - पूर्वोक्त, पृ. १५९.

३९) कित्ता - पृ. १८६-८७.

४०) कित्ता - पृ. २२१.

४१) सरदार गं.बा. - "महात्मा फुले - व्यक्ति आणि विचार," पृ. १८३.